# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रो
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/३५३/२०१५—१६
दिनांक : ०३/०८/२०१५.

प्रति,
प्राचार्य,
राष्ट्रीय सेवा योजना मुंबई विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये,

संदर्भ:—राज्यरक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांचे द्वारे प्राप्त पत्र क्र.रा.स.प./महाविद्यालय रक्तदान शिबिर/२०१५/६२२, दिनांक २४ जुलै, २०१५.

विषय:—शासकिय व निमशासकिय रक्तपेढयांना प्राथमिकतेने/प्राधान्याने रक्तदान शिबिर देणे बाबत.

मा. महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये दरवर्षी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून बहुमुल्य असे समाजउपयोगी कार्य करीत असतात. शासकीय व निमशासकीय रूग्णालयात दाखल झालेल्या रूग्णांना मोठया प्रमाणात रक्त व रक्त घटकांची आवश्यकता असते.

सदर बाब लक्षात घेऊन उपरोक्त निर्देशित पत्राद्वारे राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र राज्य यांचे कडून राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयीन एककांद्वारे आयोजित रक्तदान शिबिरे ही प्राथमिकतेन शासकिय व महानगरपालिका रग्णालयांना देण्याचे निर्देश दिले आहेत.

तरी या पत्राद्वारे सर्व महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककांद्वारे आयोजित जास्तीत जास्त रक्तदान शिबिरे प्राथमिकतेने/प्राधान्याने शासकीय व निमशासकिय रक्तपेढयांना देण्यात यावीत. हि विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

प्रा. बी.एस. बिडवे
कार्यक्रम समन्वयक. रा.से.यो.

प्रत : माहितीकरिता

१) राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र राज्य.
२) सह—समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठ.